सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

**क्र. ३५] मंगळवार, दिनांक २२ नोव्हेंबर २०२२ : अग्रहायण १, शके १९४४ [किंमत ०.०० रु.]**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत**

# भाग एक-अ औरंगाबाद विभाग

१

**जिल्हाधिकारी लातूर यांजकडून**

**(नगर प्रशासन विभाग)**

**आदेश**

**क्र. २०२२/नपाप्र/निवडणूक/कक्ष-३/कावि-१००३.–** ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३४१ ब-३(१) अन्वये अध्यक्षपदाची निवड झाल्यापासुन सात दिवसाचे आत नगर पंचायत सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचे प्रयोजनासाठी जिल्हाधिकारी यांनी नगर पंचायत सदस्यांची विशेष सभा आयोजित करण्याची तरतुद असून महाराष्ट्र नगर परिषदा आणि नगर पंचायती नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पध्दत) नियम २०१० व सुधारणा नियम २०१२ नुसार नियुक्त्यांची कार्यप्रणाली निश्चित करुन दिलेली असून मुळ नियमातील नियम ६ नुसार शक्य तितक्या लवकर नामनिर्देशित केलेल्या सदस्यांची नावे जिल्हाधिकारी यांनी राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी पाठवावयाची आहेत.

त्याअर्थी उक्त अधिनियमान्वये व नियमान्वये प्राप्त अधिकारानुसार मी पृथ्वीराज बी.पी., जिल्हाधिकारी लातूर या द्वारे आदेशित करतो की, लातूर जिल्ह्यातील चाकूर, जळकोट व देवणी या तीन नगर पंचायतीच्या नामनिर्देशित सदस्य पदाच्या निवडीसाठी दि. १४.०७.२०२२, दि. ०१.११.२०२२ व दिनांक ०२.११.२०२२ रोजीच्या विशेष सभेमध्ये खालील परिशिष्ट क मध्ये दर्शविलेल्या व्यक्ती या त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या नगर पंचायतीचे नामनिर्देशीत सदस्य म्हणून विद्यमान नगर पंचायतीच्या कालावधीकरिता नियुक्त झालेले आहेत.

| अ.क्र. | नगर पंचायतीचे नाव | नामनिर्देशीत सदस्यांचे नाव | पक्ष / गट / आघाडी |
|---|---|---|---|
| १ | चाकूर | श्री.रेड्डी नितीन गुणाजी | प्रहार जनशक्ती पक्ष गट |
| २ | देवणी | श्री योगेश नागनाथ ढगे | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, अपक्ष |
| ३ | जळकोट | श्री किडे गजेंद्र धोंडीबाराव | जळकोट भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व शिवसेना गट |
| | | श्री.मोमीन अजीज मियॉसाब | राष्ट्रवादी काँग्रेस व अपक्ष गट जळकोट |

स्थळ : लातूर

दिनांक : २२.११.२०२२

**पृथ्वीराज बी.पी.,**

जिल्हाधिकारी, लातूर.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, AURANGABAD-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.